नियमित दिवाणी दावा क्र. २८५/२०१२ मधील नि. १३६ खालील आदेश
(रंगराव साळुंखे वगैरे विरुध्द आनंदराव साळुंखे )
CNR No. MHSN05-000426-2012

विचाराधिन अर्ज प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी त्यांचेतर्फे त्यांच्या विरुध्द झालेला "उलट तपास नाही " हा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचे म्हणणे असे आहे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून त्याचा पृथ्थक कब्जा वादी यांना मिळणेकरीता सदरचा दावा दाखल केला होता व आहे. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी वेळेत वादी यांचा उलटतपास न घेतलेने दि. ०९.०६.२०१७ रोजी प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचेविरुध्द “उलटतपास नाही” असा आदेश पारीत केलेला आहे. सदर प्रतिवादी यांना मुदतीच्या कायदयाचे ज्ञान नसलेमुळे तसेच सन २०१९-२०२१ पर्यंत कोरोना-१९ या विषाणुचे संक्रमण असल्याकारणाने तसेच भारत सरकारच्या निर्देषाप्रमाणे भारतामध्ये लॉकडाऊन असल्यामुळे प्रतिवादी यांना वादीचा वेळेत उलटतपास घेता आला नाही. प्रतिवादी यांनी जाणुनबुझून उलटतपास घेणेस विलंब केलेला नाही. सबब सदरचा आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज मंजूर करुन उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेस विनंती केली.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास नि.१३८ वर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. वादी कथन करतात की, प्रतिवादी यांनी कोरोना -१९ मुळे उलटतपास घेतलेला नाही असे नमुद केलेले आहे. परंतु वादी यांचा अंशतः उलटतपास झालेला आहे. तसेच वादीचे सरतपासाचे ॲफिडेव्हीट साधारणतः दोन वर्षापुर्वी दाखल केलेले आहे. तसेच टाळेबंदीनंतर कोर्ट कामकाज गेली सहा ते सात महिन्यांपासून सुरळीत आहे. सदरबाबत प्रतिवादी यांनी कोणतेही कारण दिलेले नाही. सबब अर्ज नामंजूर करणे विनंती वादी यांनी केली आहे. यदाकदाचित सदरचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत मे. कोर्ट आलेस प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.३,०००/- (रु. तीन हजार मात्र) कॉस्टच्या अधिन राहून मंजूर करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

४. दोन्ही पक्षाचे ऐकले. अभिलेख व अर्जामधील मजकूर पहाता असे दिसते की, कोरोना १९ च्या महामारीमुळे व मुदतीच्या कायदयाचे ज्ञान नसलेमुळे प्रतिवादी यांनी वेळेत वादी यांचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी नमूद केलेली कारणे संयुक्तीक वाटतात व त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ ते ६ विरुध्द झालेला “उलटतपास नाही” असा आदेश रद्द करण्यास प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी पुरेसे कारण नमूद केले आहे असे दिसते. तसेच सदरचा अर्ज मंजूर करण्यास प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना जो काही विलंब झाला आहे त्याबाबत वादी यांना योग्य ती कॉस्ट देणे योग्य आहे व तसे केल्याने प्रतिवादींचे कुठलेही न भरुन येणारे नुकसान होणार नाही. त्यामुळे मी पुढील आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी वादी यांना कॉस्ट रु. ७००/- (रु. सातशे फक्त) देणेसह अर्ज मंजूर करणेत येतो.

Digitally signed by NIKHIL DHANAJIRAO JADHAV
Date: 2022.01.29 17:55:43 +0530

इस्लामपूर
दि. २९/०१/२०२२

(एन. डी. जाधव)
४थे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
इस्लामपूर

C E R T I F I C A T E

I affirm that the contents of the P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. R.S.Kolekar |
| Court Name | : | $4^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Islampur. |
| Date of Order/Judgment | : | 29.01.2022 |
| Signed by P.O. on | : | 29.01.2022 |
| Uploaded on | : | 29.01.2022 |